# अमरावती महानगरपालिका, अमरावती

**प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ८ मधील कराधान नियम ९,१३,१४,१५ व २० अन्वये आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भुखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून अमरावती महानगरपालिकेने सन २०२३-२४ ते सन २०२७-२८ या पाच वर्षाकरीता इमारतींचे व भुखंडाचे कर निर्धारणाबाबत सुधारीत करण्यात आलेल्या करमुल्याकंनाच्या क्षेत्रीय कार्यालय व वार्ड निहाय यादी प्रसिद्ध करण्यात आल्या असून प्रत्येक मालमत्ता धारकास वैयक्तिक स्तरावर नोटीस बजावण्यात येत आहे तसेच प्रसिद्ध केलेली प्रारूप करमुल्यांकन यादी महानगरपालिकेच्या सर्व झोन कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

संबंधित मालमत्ता धारकांना या बाबत आपली इमारत किंवा जागा यांचे सुधारित करयोग्य मूल्य अथवा कर आकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क इ. बाबत आपली काही हरकत असल्यास कारणासह लेखी अर्जाव्दारे संबंधीत झोनचे सहाय्यक आयुक्त, यांच्याकडे यादी प्रसिद्ध केल्यापासून अथवा वैयक्तिक नोटीस प्राप्त झाल्यापासून २१ दिवसाच्या आत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत हरकत नोंदवून पोचपावती घ्यावी असे जाहिर सुचनेद्वारा वेळोवेळी नागरीकांना अवगत करण्यात आले आहे. वरीलप्रमाणे हरकत घेण्याकरीता महानगरपालिकेतर्फे कोणत्याही प्रकारे हरकत अर्जाचा नमुना उपलब्ध करून दिलेला नाही किंबहुना तसा नमुना अर्ज उपलब्ध करून देणे अपेक्षितही नाही.

तथापि काही उपद्रव मुल्यांकडून महानगरपालिकेचे प्रतिनिधी असल्याची बतावणी करून अशाप्रकारचे हरकत अर्ज विक्री केल्या जात असल्याची बाब समाजमाध्यमांमधून प्रसिध्द होत आहे. त्याअनुषंगाने शहरातील सर्व मालमत्ताधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, महानगरपालिकेचे प्रतिनिधी असल्याची बतावणी करून अशाप्रकारचे हरकत अर्ज विक्री करणा-या कुठल्याही व्यक्तिचा महानगरपालिकेशी संबंध नाही. तसेच आपल्या मालमत्ते विषयी हरकतीचा मुद्या नमुद करून टंकलिखीत किंवा हस्तलिखीत अर्ज संबंधीत झोन कार्यालयात स्विकारल्या जातो व सुनावणीची कायदेशिर प्रक्रिया पार पाडली जाते. त्याअनुषंगाने मालमत्ताधारकांनी कुठल्याही अफवांना बळी न पडता महानगरपालिकेस सहकार्य करावे.

स्वा /-<br>(देविदास पवार)<br>**आयुक्त**<br>**अमरावती महानगरपालिका, अमरावती**